# जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे येथे ९०० खाटांचे जिल्हा रुग्णालय ,संदर्भ सेवा रुग्णालय व परिचारिका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृह इमारतीचे बांधकाम करणे .



- **प्रशासकीय मान्यता** : सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. 2021/प्र.क्र.176/आरोग्य -3 अ, मंत्रालय 10 मजला, संकुल इमारत, गो.ते रुग्णालय आवार, मुंबई यांनी दि.04/03/2022 अन्वये रु.527.41 कोटी इतक्या रकमेस मान्यता दिलेली आहे.
- **निविदा रक्कम** :रु.४३४.०० कोटी
- **कार्यारंभ आदेश :** दि.३.२.२०२३
- **कामाचा कालावधी :** १८ महिने (दि.३.२.२०२३ ते दि.२.८.२०२४)
- **जागेची उपलब्धतता :** सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या मालकीचा भूखंड क्र. 10/27/ 11204.86 चौ.मी. व भूखंड क्र. 10/7 (4626.02 चौ.मी.) असे आहे. एकूण क्षेत्रफळ 15830.88 चौ.मी

**कामाचा वाव :**

| | |
|---|---|
| • जिल्हा रूग्णालय, संदर्भ सेवा रूग्णालय, इमारत (2 बेसमेंट + तळ + 10 मजले), बांधकाम क्षेत्रफळ | **51,140 चौ.मी**. |
| • कार प्लाझा कार प्लाझा (तळ + 7 मजले) | **13,625.00 चौ.मी.** |
| • शवागार इमारत तळ मजला - बांधकाम क्षेत्रफळ | **569.00 चौ.मी.** |
| • परिचारिका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृह इमारत (2 बेसमेंट + तळ + 10 मजले), बांधकाम क्षेत्रफळ | **25,941.00 चौ.मी.** |
| • इतर अनुषंगीक बाबींचे बांधकाम क्षेत्रफळ | **1,264.00 चौ.मी.** |
| एकूण बांधकाम क्षेत्रफळ | **92,539.00 चौ.मी.** |

## विशेष बाबी

:

- रूग्णालय इमारतीवर एअर अम्बुलन्स उतरण्याची सोय
- वाहनतळाची सोय : चारचाकी - 412 वाहनासाठी
  : दोन चाकी - 1200 वाहनसाठी
- रूग्णालय इमारत :
- अ जिल्हा सामान्य रूग्णालय : 500 खाटा
- ब महिला व बाल रूग्णालय : 200 खाटा
- क संदर्भ सेवा रूग्णालय : 200 खाटा
  एकूण खाटांची संख्या : 900 खाटा
- परिचारिका प्रशिक्षण केंद्र व वसतीगृह :
- अ वसतीगृह - 182 परिचाकांसाठी (91 खोल्या 2 बेड प्रती खोली)
- ब प्रशिक्षण केंद्र - 600 बैठक व्यवस्था

| | कामाची सद्यस्थिती |
|---|---|
| अ | मुख्य रुग्णालय इमारत (2 बेसमेंट + तळ + 10 मजले) |
| | आर.सी.सी. काम पूर्ण, ब्लॉक वर्क, अंतर्गत व बाह्य गिलावा, फर्शी-7 वा मजला प्रगतीत, फॉल्स सिलिंग प्रगतीत, MEP 10 वा मजला प्रगतीत, मेडिकल गॅस- 7/8 वा मजला प्रगतीत, दरवाजे/खिडक्या कामे प्रगतीत, रंगकाम 3/4 था मजला प्रगतीत,<br>सर्व कामे – ACP चे काम वगळुन -माहे मे-2025 अखेर पूर्ण होतील. |
| ब | परिचारीका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृहाची इमारत (2 बेसमेंट + तळ + 10 मजले) |
| | दिनांक 05/07/2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी संरक्षण कार्यालय, भारत सरकार कडून सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना जमीन हस्तांतरित केली आहे.<br>सदरचा भुखंड उपभोक्ता विभागाने दिनांक 01/06/2024 रोजी बांधकामासाठी उद्योजकास हस्तांतरीत केलेला आहे.<br>सदरच्या भुखंडावरील इमारतीसाठी TMC कडून LOI दि. 07/03/2024 रोजी मंजुरी प्राप्त.<br>सदरच्या भुखंडावरील जुन्या इमारती पाडण्याचे काम दि. 30/10/2024 रोजी पूर्ण.<br>सदरच्या इमारतीचे आर.सी.सी. काम प्रगतीत. (बेसमेंट) |
| क | वाहनतळ इमारत (तळ + 7 मजले) |
| 1 | सदरच्या इमारतीचे अंतिम काम प्रगतीत आहे. |
| 2 | भूमीगत पाण्याच्या टाकीचे आर.सी.सी. चे काम पूर्ण व STP / ETP चे काम पूर्ण. |
| ड | शवागार इमारतीचे काम (तळ मजला) |
| | सदरच्या इमारतीचे आर.सी.सी. चे काम पूर्ण. अंतर्गत व बाहय फिनिंशींगची कामे प्रगतीत |
| इ | विदयुत सबस्टेशन आर.सी.सी. चे काम पूर्ण. |

- **कामाचा आर्थिक प्रगती अहवाल**

सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रू. 527.41 कोटी, निविदा रक्कम रू. 362.0 कोटी, मंजुर निविदा रक्कम रू. 434.0 कोटी

| अनु.क्र. | बाब | हुडको योजने अंतर्गत निधी | कामावर झालेला खर्च (हुडको / आरोग्य विभाग ) | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | तरतुद (सन 2022-23) | 0 | 27868 लक्ष<br>27868 लक्ष<br>2174.72 लक्ष<br>एकुण खर्च 30042.72 लक्ष | उपलब्ध निधी<br>४२१०३२०२ हुडको अंतर्गत खर्च<br>४२१०००१४ सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च |
| 2 | वितरण (सन 2022-23) | 0 | | |
| 3 | खर्च (सन 2022-23) | 0 | | |
| 4 | माहे मार्च 2024 अखेर खर्च | 24174.72 लक्ष | | |

- **प्रलंबित देयक- 150.00 कोटी**

## विलंबाची कारणे

- मुख्य रूग्णालय इमारतीचा भुखंड उद्योजकास जिल्हा शल्य चिकीत्सक ठाणे या उपभोक्ता विभागाकडून दिनांक 07/6/2023 रोजी बांधकामासठी हस्तांतरीत करण्यात आलेला होता. म्हणजेच कार्यारंभ आदेशानंतर 121 दिवसांनतर बांधकामासाठी उद्योजकास जागा उपलब्ध करून मिळाली होती

- जिल्हा सामान्य रूग्णालय ठाणे अंतर्गत मुख्य रूग्णालय इमारतीच्या बांधकामासोबतच परिचारीका प्रशिक्षण केंद्र व वसतीगृह इमारतीचे बांधकाम करणे अंर्तभुत आहे. परंतु परिचारीका प्रशिक्षण केंद्र व वसतीगृह इमारतीसाठी लागणारा भुखंड हा दिनांक 01/06/2024 रोजी उपभोक्त विभागाने बांधकामासाठी उद्योजकास हस्तांतरीत केलेला आहे. म्हणजेच कार्यारंभ आदेशानंतर 477 दिवसानंतर भुखंड हस्तांतरीत केलेला आहे.

- ठाणे महानगरपालिका यांनी मंजुर केलेल्या सी.सी. नकाशानुसार उद्योजकानी यापुर्वी इमारतीचे बांधकाम केले आहे. परंतु उपभोक्ता विभागाने सध्या सुरू असलेल्या मुख्य रूग्णालय इमारतीच्या बांधकामामध्ये मोठया प्रमाणात बदल सुचविलेले आहेत, त्या सुचविलेल्या बदलानुसार उद्योजकास पुन्हा नव्याने कामे करावी लागणार असल्याने त्यासाठी अधिकचा 90 दिवसांचा अतिरीक्त कालावधी लागणार आहे असे उद्योजकाने लेखी स्वरूपात दिलेले आहे.

## Modular furniture व MSEB एकत्रित अंदाजपत्रकाची सद्यस्थिती -

- Modular furniture व MSEB एकत्रित अंदाजपत्रक रुपये ८८.४४ कोटी सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांनी E-office no 972662 dated 18/02/2025 अन्वये सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे मंजूरीस्तव सादर

- **सुधारीत अंदजापत्रक तयार करणे आवश्यक असण्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.**

- सु सुधारित अंदाजपत्रकीय किमत रु 636.00 कोटी

1) सदर कामाची निविदा रक्कम रू. 361.37 कोटी असून उद्योजकाची निविदा ही शासन स्तरावर रू. 434.00 कोटी अधीक दराची मंजुर झालेली आहे. (रू.72.63 कोटी अधिकची रक्कम)
2) सुधारीत अंदाजपत्रकांस मंजुरी मिळाली त्यावेळेस प्रचलित शासन निर्णयानुसार वस्तु व सेवा कर 12% होता परंतु सदर कामाचया निविदेवेळेस वाढ होवून 18% झाला आहे. त्यामुळे सुसुधारीत प्रशासकीय रक्कमेमध्ये 6% नी वाढ झालेली आहे. (रू.26.04 कोटी अधिकची रक्कम)
3) उपभोक्ता विभागाने कामाच्या अंतर्गत बांधकामात केलेल्या बदलामुळे (दिनांक २४/०४/२०२४ व १२/०६/२०२४ रोजी उपसंचालक आरोग्य सेवा सेवा मुंबई मंडळ ठाणे यांचे दालनात झालेली बैठक ) बाबींच्या वावात बदल झाला. याबदलामुळे कामाची वाढीव रक्कम रू. 42.89 कोटी इतकी आहे.
4) कामाच्या वाढीव रक्कमेवर 3% आकस्मिक खर्च, 1% कामगार विमा, 1% साहित्य गुणवत्ता चाचणी शुल्क, 1% स्वामित्वधन व स्थानिक प्राधिकरण शुल्क इत्यादी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. (रू. 40.30 कोटी अधिकची रक्कम)

- एकुण मुळ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीच्या तुलनेत वरील प्रमाणे 1, 2, व 4 या बाबींची एकुण रक्कम व change of scope ची रक्कम रू. 42.89 कोटी रक्कम वगळता इतर कारणांमुळे रूपये (108.58 - 42.89 = रू. 65.69 कोटी ) व टक्केवारी (20.58 - 8.13 = 12.45%) अशी वाढ झालेली आहे.




# 900 Bedded Hospital Building



# 900 Bedded Hospital Building Ground Floor




**900 Bedded Hospital Building Ground Floor Internal Works.**



**Parking Building**




# Nursing Training centre and Hostel Building Basement


Thank you!